—: प्रेसनोट :— दिनांक :— २१/०६/२०२१

फिर्यादी हे राहत असलेल्या सोसायटीचे नुतनीकरणाची परवानगी नसलेबाबत व दुरुस्तीचे कामामुळे पसरलेल्या अस्वच्छतेमुळे दंडात्मक कारवाई न करण्यासाठी आरोपी लोकसेवक याने रू. २०,०००/— लाचेची मागणी करून रू. १५,०००/— लाचेची रक्कम स्विकारली म्हणून गुन्हा नोंद.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | बृहन्मुंबई विभाग. |
| गुन्हा नोंद क्रमांक | २८/२०२१ |
| कलम | कलम —७ भ्र.प्र.कायदा १९८८ |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | संजय रामभरोसी शर्मा, वय ५२ वर्षे, धंदा—नोकरी, कनिष्ठ अवेक्षक,सार्वजनिक आरोग्य/किटकनाशक विभाग, पी/उत्तर वार्ड ,मालाड, बृहन्मुंबई महानगर पालिका, मुंबई |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रुपये २०,०००/— |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये १५,०००/— |
| हस्तगत रक्कम | रुपये १०,०००/— |
| थोडक्यात माहिती | फिर्यादी हे मालवणी परिसरात वास्तव्यास असून ते वैद्यकीय शिक्षण घेत आहेत. ते राहत असलेल्या सोसायटी कमिटीचे सभासद आहेत. ते राहत असलेल्या सोसायटीच्या नुतनीकरणाचे काम चालु असल्याने त्यांचे इमारतीसमोर डेब्रिज पडल्या असून पावसाचे पाणी साठलेले आहे. दि.०८/०६/२१ रोजी यातील लोकसेवक याने सदर सोसायटीला भेट देवून कामाची परवानगी नसलेबाबत व दुरुस्तीचे कामामुळे पसरलेल्या अस्वच्छतेमुळे डासांचा प्रादुर्भाव होत असल्याचे कारण देवून रू. ४५,०००/— ची दंडात्मक कारवाई करणार असल्याचे सांगितले तसेच दंडात्मक कारवाई करायची नसल्यास रुपये २०,०००/— लाचेच्या रकमेची मागणी केली.<br>परंतु फिर्यादी यांची लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दि. १५/०६/२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई या कार्यालयास लेखी तक्रार दिली. फिर्यादीच्या तक्रारीवरुन दि. १९/०६/२१ रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक यांनी फिर्यादी यांच्याकडून तडजोडीअंती रुपये १५,०००/— लाच मागितल्याचे निष्पन्न झाले.<br>दि २१/०६/२०२१ रोजी सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक याने रु. १५,०००/— रकमेची लाच स्विकारली. त्यापैकी रूपये १२०००/— त्याने त्याचे युनियन बॅंकेतील खात्यात भरले, आरोपी लोकसेवक यास ताब्यात घेतले असता, त्याचेकडे रू. २५००/— इतकी लाचेची रक्कम मिळून आली. तसेच बॅंकेत भरलेल्या रकमेपैकी रूपये ७५००/— लाचेची रक्कम बॅंकेमधून हस्तगत करण्यात आलेले आहेत. वर नमूद आरोपी लोकसेवक याचे विरूध्द कलम ७, भ्र.प्र.अधि. १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून अधिक तपास चालू आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग,९१, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२,
फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,
वेबसाईट—acbmaharashtra.gov.in,
ईमेल :acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल :addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक :www.facebook.com - Maharashtra ACB.
मोबाईल ॲप :www.acbmaharashtra.net,

( प्रदिप देवकर )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई